**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी**

**अहवाल**

**विद्यार्थी स्वागत समारंभ, क्रांती दिन, व जागतिक आदिवासी**

दि. १० अ ॅागष्ट, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी येथे विद्यार्थी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून मा. रणवीरराजे पंडित, मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रशांत साबळे, (वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा) व अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग, IQAC विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात क्रांती दिन, व जागतिक आदिवासी दिनही साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन करून, स्वातंत्र्य सेनानींना अभिवादन करण्यात आले.

मा. रणवीरराजे पंडित यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना विकासासाठी, प्रगतीसाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन असून, विद्यार्थ्यांनी स्वप्नांना आकार देण्यासाठी आपले आचार व विचार बदलावे लागतील, त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, आसे सांगून वेळ आणि पैशाचे महत्त्वही ओळखता आले पाहिजे. आणि ते पुस्तक आणि अनुभवाचा समन्वय साधून शक्य होईल. असे रणवीरराजे यांनी सांगून विद्यार्थ्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. प्रशांत साबळे यांनी क्रांती दिनाचे महत्त्व आणि इतिहास सांगितला. स्वातंत्र्याप्रती आपण सजग आणि जबाबदारी पुर्वक वर्तन ठेवणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. तर अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी आत्मभानाची सुरूवात म्हणजे शिक्षण असून, ते अधिक गांभिर्यपुर्वक घेतले पाहिजे. तरच पुढची वाटचाल आशादायी असेल असेही सांगितले.

कार्यक्रमात बी. ए. व बी. एस्सी. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने स्वागत केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. संतोष यशवंतकर, प्रास्ताविक प्रा. रमेश रिंगणे यांनी केले. तर आभार डॉ. राणी जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.